मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# काळ्या काचेच्या क्रेझसाठी मोजले तब्बल चार कोटी!

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई : पंधरा महिन्यांत 71 हजार वाहनचालकांवर कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

काळ्या काचा असलेल्या वाहनांवर पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांची धडक कारवाई सुरू आहे. मागील पंधरा महिन्यात ७१ हजार ३१५ बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करून तब्बल ३ कोटी ९२ लाख १ हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. त्यामुळे वाहनांच्या काळ्या काचा पिंपरी-चिंचवडकारांना चांगल्याच महागात पडल्याचे दिसून येत आहे.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने २९ मार्च ते ४ एप्रिल दरम्यान विशेष मोहीम राबविण्यात आली होती. या कालावधीत कारला काळ्या काचा लावल्याने ३ हजार ४३५ वाहनचालकांवर कारवाई करीत ३८ लाखांचा दंड वसूल करण्यात आला आहे. आचारसंहिता कालावधीत विशेष मोहीम राबवून वाहनांची तपासणी केली जात आहे. पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे अन् अतिरिक्त आयुक्त वसंत परदेशी हे स्वतः अचानक तपासणी नाक्यावर जाऊन कामकाजाची पाहणी करीत आहेत.

शहर परिसरातील स्थानिक तरुणांमध्ये वाहनांच्या काळ्या काचांची मोठी क्रेझ आहे. काळा रंग असलेल्या कारच्या काचांना गडद फिल्म बसवण्याचा ट्रेंड सध्या शहरात सुरू असल्याचे पाहावयास मिळते. अशा फिल्म असलेल्या वाहनाच्या आतील बाहेरून काहीही दिसत नाही. अशा वाहनांवर वाहतूक पोलिसांची नियमित कारवाई सुरू असल्याचे दंडाच्या आकडेवारीवरून अधोरेखित झाले आहे.

वाहतूक पोलिसांनी मागील पंधरा महिन्यात कोट्यवधी रुपयांचा दंड आकराला आहे. तसेच, याच तुलनेत जुना प्रलंबित असलेला दंड वसूलही केला आहे. असे असले तरीही तरुणांनी काचांवरील ब्लॅक फिल्म काढली नसल्याचे बहुतांश ठिकाणी दिसून येत आहे.



> काळ्या फिल्म असलेल्या वाहनांमध्ये गैरप्रकार घडू शकतात. अशा' फिल्म' लावणे बेकायदेशीर आहे. वाहतूक शाखेकडून काळ्या फिल्मवर नियमित कारवाई सुरू आहे. वाहनचालकांनी नियमांचे पालन करून पोलिसांना सहकार्य करावे.
>
> - विशाल गायकवाड, पोलीस उपायुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड

### दुसऱ्यांदा तिप्पट दंड

काळ्या काचा असणाऱ्या वाहनांना पहिल्यांदा ५०० तर दुसऱ्यांदा दीड हजार रुपये दंड आकारला जातो. चौकात तैनात असलेले वाहतूक पोलीस फोटो काढून वाहनांवर दंड आकारतात. या व्यतिरिक्त वाहतूक महामर्गांवर बसविण्यात आलेल्या स्पीड गनच्या इन्टरसेप्टर वाहनातील मशीनव्दारेही काळ्या फिल्म असलेल्या वाहनांवर दंड आकारला जातो.

### गुन्ह्यांसाठी होतो वापर

चारचाकी वाहनांच्या काचांवर काळ्या फिल्म लावल्यामुळे वाहनात कोण बसले आहे, ते काय करीत आहेत, हे दिसून येत नाही. गुन्हेगारी कृत्यासाठी अशा काचा असलेल्या वाहनांचा वापर झाल्याचे प्रकार यापूर्वी समोर आले आहे. त्यामुळे काळ्या फिल्मच्या वापरावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अशा वाहनांकडे जास्त लक्ष राहणार आहे.

# नालेसफाई अद्याप कागदावर!

## साफसफाईचे आयुक्तांचे आदेश : अद्यापही नालेसफाईला सुरुवात नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत लहान-मोठे असे १४८ नाले आहेत. शंभर किलोमीटर अंतराच्या या नाल्यांची ३१ मे पूर्वी यांत्रिकी पद्धतीने साफसफाईचे आदेश आयुक्तांनी दिल्यानंतरही काही क्षेत्रीय कार्यालयातील नालेसफाईच्या कामाला सुरुवातच झालेली नाही. नालेसाफसफाई अद्याप कागदावरच आहे.

पिंपरी-चिंचवड शहरामध्ये दोन ते ११ मीटर रुंदीचे शंभर किलो मीटर अंतराचे १४८ नैसर्गिक नाले आहेत. हे नाले शहरातील पवना, मुळा व इंद्रायणी या नद्यांना जाऊन मिळतात. सर्वच नाले उघडे असल्याने या नाल्यांमध्ये राडारोडा, प्लास्टिक, भंगार आणि टाकाऊ साहित्य टाकले जाते. नाल्यात गाळ साचल्याने नाले अरुंद आणि उथळ होतात. परिणामी, पावसाळ्यात



पाणी वाहून नेण्याची त्यांची क्षमता कमी होते. पावसाळ्याचे पाणी वाहून न गेल्याने ते साचून परिसरातील घर आणि दुकानांमध्ये शिरते. पावसाळ्यामध्ये शहरात पूरस्थिती निर्माण होऊ नये, म्हणून आरोग्य विभागाकडून दरवर्षी सर्व नाले स्वच्छ केले जातात. त्यासाठी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी २२ मार्चला नालेसफाई करण्याचे आदेश दिले आहेत.

जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये मान्सूनपूर्व पावसाला सुरुवात होते. पाऊस सुरू झाल्यास काम करता येत नाही. त्यामुळे उन्हाळ्यातच हे काम पूर्ण करणे आवश्यक असते. त्यासाठी महापालिकेच्या आरोग्य, स्थापत्य विभाग व क्षेत्रीय कार्यालयांना याबाबत सूचित करण्यात आले आहे. परंतु, अद्यापही नालेसफाईला सुरुवात झाली नाही.

# मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर अवजड वाहनांना 9 एप्रिलपर्यंत बंदी!

## महामार्गावर तीन दिवस अवजड वाहनांना सकाळी 6 ते दुपारी 12 वाजण्याच्या दरम्यान वाहतुकीस बंदी

**पुणे | प्रतिनिधी**

सलग सुट्ट्यांमुळे मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आणि पर्यटनासाठी जाणाऱ्या प्रवासी वाहनांना रस्ता उपलब्ध व्हावा याकरिता सहा एप्रिल ते नऊ एप्रिल असे तीन दिवस अवजड वाहनांना मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर सकाळी सहा ते दुपारी बारा वाजण्याच्या दरम्यान वाहतुकीस बंदी घालण्यात येणार असून ही वाहने कडेला थांबवण्यात येणार आहे. तसेच गैरसोय टाळण्यासाठी अवजड वाहन चालक, मालकानी नमूद वेळेमध्ये वाहने आणू नयेत असे देखील आवाहन बोरघाट महामार्ग पोलिसांनी केले आहे.

शाळा आणि महाविद्यालय यांना उन्हयाळ्याची सुटी लागल्यामुळे वाहनांच्या संख्येत प्रचंड प्रमाण वाढ होत असते. मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर महामार्ग पोलीस केंद्र बोरघाट हद्दीत घाट सेक्शन व मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग व एन. एच ४८ असा संयुक्तिक महामार्ग एकत्र येत असल्याने वाहनांचे प्रमाण अधिक होऊन वाहतूक संथ गतीने चालू असते. वाहतूक नियमन करण्यासाठी खालील प्रमाणे प्रयत्न करण्यात येणार आहेत. वाहतुकीचे नियमन करण्यासाठी दिवसा अवजड वाहने घाट सुरू होण्यापूर्वी शोल्डर लेनवर तसेच पार्कींगच्या ठिकाणी थांबवून हलक्या वाहनांना प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे.

मोटरीव्यासंख्येत वाढ झाल्यानंतर वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पुणे मर्गिकवेरील ताण कमी करण्यासाठी दहा ते पंधरा मिनिटे वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. मुंबई वाहिनीवरील वाहतूक खंडाळा बोगदा या ठिकाणी थांबवून पुणे वाहिनीवरील वाहतूक विरूध्द दिशेने वळविण्यात येणार आणि वाहतूक सुरळीत करण्यात येणार आहे. तापमान वाढीमुळे जड अवजड वाहने बंद पडत आहेत. त्यांना क्रेन, पुलर, पोलीस क्रेनच्या सहाय्याने लवकरात लवकर काढून वाहतुकीसाठी मार्गिका उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.



पहिल्या मार्गिकेवर चालणाऱ्या जड अवजड वाहन चालकांवर खटला भरून त्यांना न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. बोरघाट पोलिसांनी जड अवजड वाहन मालक आणि चालक संघटना यांना आवाहन केले आहे की, त्यांनी सहा एप्रिल ते नऊ एप्रिल दरम्यान मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर पुणे मर्गिकेवर सकाळी सहा ते दुपारी बारा यावेळेत प्रवास टाळावा.

अतिरिक्त पोलीस महसंचालक सुखविंदर सिंह, रायगड परीक्षेत्राचे पोलीस अधीक्षक तानाजी चिखले, पोलीस उपअधीक्षक घनःश्याम पलंगे, पनवेल विभागाच्या पोलीस निरीक्षक गौरी मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती बोरघाट महामार्गचे सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश भोसले यांनी दिली.

# पुण्यात शंभरहून अधिक रुग्णालये विनापरवाना

## महापालिकेच्या हद्दीत 840 खासगी रुग्णालये : 100 रुग्णालयांच्या परवान्याचे नूतनीकरण नाही

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील सुमारे शंभरहून अधिक खासगी रुग्णालये विनापरवाना सुरू असल्याची बाब समोर आली आहे. या रुग्णालयांच्या परवान्याची मुदत ३१ मार्चअखेर संपली असून, त्यांनी अद्याप नूतनीकरण केलेले नाही.

महापालिकेच्या हद्दीत ८४० खासगी रुग्णालये आहेत. त्यातील ४१० रुग्णालयांच्या परवान्याचे नूतनीकरण मार्चअखेरपर्यंत पूर्ण होणे आवश्यक होते. कारण त्यांच्या परवान्याची मुदत ३१ मार्चला संपुष्टात आली. महापालिकेच्या आरोग्य विभागाने २२ फेब्रुवारी ते ५ मार्च या कालावधीत यासाठी एक खिडकी योजनेसह विशेष मोहीम राबविली. त्यात ४१० पैकी केवळ २६८ रुग्णालयांनी परवान्याचे नूतनीकरण केले. त्यानंतर आतापर्यंत सुमारे ४० रुग्णालयांनी परवान्याचे नूतनीकरण केले आहे. यामुळे आजच्या घडीला नूतनीकरण झालेल्या रुग्णालयांची संख्या ३१० वर पोहोचली असून, १०० रुग्णालयांच्या परवान्याचे नूतनीकरण झालेले नाही.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महापालिकेकडून परवान्याचे नूतनीकरण न करणाऱ्या रुग्णालयांवर दंडात्मक कारवाई केली जाते. महापालिकेला ही रुग्णालये बंद करण्याचे अधिकार नाहीत. त्यामुळे वैध परवाना नसताना सेवा देणाऱ्या या रुग्णालयांना दरमहा केवळ १०० रुपये दंड केला जातो. या दंडाची सर्वाधिक रक्कम पाच हजार रुपये आहे. त्यामुळे दंडात्मक कारवाईला ही रुग्णालये जुमानत नसल्याचे चित्र आहे. याचबरोबर महापालिकेचे कर्मचारी मोठ्या प्रमाणात निवडणुकीच्या कामात गुंतले असल्याने परवाना नूतनीकरणावरही परिणाम होत आहे.




**शहरातील खासगी रुग्णालये**

एकूण रुग्णालये – ८४०

यंदा परवान्याची मुदत संपणारी रुग्णालये – ४१०

परवाना नूतनीकरण केलेली रुग्णालये – ३१०

परवाना नूतनीकरण न झालेली रुग्णालये – १००

> परवाना नूतनीकरण न केलेल्या रुग्णालयांना नोटीस बजावण्यात येत आहे. याबाबत क्षेत्रीय वैद्यकीय अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत. रुग्णालयांच्या परवान्याची तपासणी करण्यासाठी लवकरच मोहीम हाती घेतली जाणार आहे.
>
> – डॉ. भगवान पवार, आरोग्यप्रमुख, महापालिका

> रुग्णालयांच्या परवाना नूतनीकरणासाठी अग्निशामक दल आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची प्रमाणपत्रे आवश्यक असतात. ही दोन्ही प्रमाणपत्रे मिळविण्याची प्रक्रिया वेळखाऊ आहे. यामुळे अनेक रुग्णालयांना परवाना नूतनीकरणासाठी विलंब होत आहे.
>
> – डॉ. संजय पाटील, अध्यक्ष, हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडिया (पुणे शाखा)

# आंद्रा धरणातून मिळणाऱ्या पाण्यात घट

## उपनगरांमध्ये पाणीटंचाई : रहिवाशांनी घेतला बोअरवेलचा आधार

**पिंपरी | प्रतिनिधी**

झपाट्याने विस्तारत असलेल्या वाकड, थेरगाव, ताथवडे, पुनावळे, चऱ्होली, मोशी, डुडुळगाव या उपनगरांमध्ये पाणी समस्या गंभीर झाली आहे. बोअरवेल आटल्याने गृहनिर्माण संस्थेतील सभासदांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत असून, आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. अपुरा, तसेच कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाली आहे. आंद्रा धरणातून मिळणाऱ्या पाण्यात मोठी घट झाल्याने शहरात पाणीटंचाई भासत असून पाच दिवसांपासून समाविष्ट गावे तहानलेलीच आहेत.

गेल्या चार वर्षांपासून शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू असल्याने पाणीपुरवठ्याच्या तक्रारींमध्ये दहा महिने घट होते. मात्र, एप्रिल-मे सुरू होताच त्यामध्ये वाढ होते. त्यातच इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्याला गळती लागली असून, आंद्रा धरणातून मिळणाऱ्या पाण्यात घट झाली आहे. तीन ते चार दिवसांपासून तर अवघे २१ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी शहरासाठी मिळाले. सुमारे ५९ एमएलडी पाण्याची तूट निर्माण झाल्याने समाविष्ट गावांसह उपनगरांमध्ये पाणी समस्या भीषण झाली आहे. सुरळीत व मुबलक पाणी देण्यात महापालिका अपयशी ठरत असल्याने प्रशासनावर अवलंबून न राहता वाकड, ताथवडे, पुनावळे, थेरगाव, चऱ्होली, मोशी, डुडुळगावातील रहिवाशांनी बोअरवेलचा आधार घेतला; मात्र, उन्हाळ्यात बोअरवेल आटतात. काहींचे पाणी कमी होते. पालिकेचे पाणीदेखील कमी दाबाने येते. त्यामुळे एप्रिल महिना सुरू होताच या भागातील नागरिकांची पाण्याअभावी होरपळ सुरू असल्याचे चित्र आहे. उन्हाळ्यात टँकरच्या पाण्यावर लाखो रुपये खर्चून तहान भागवावी लागते.

शहराची झपाट्याने वाढ होत असून, मोठ्या गृहनिर्माण संस्था विकसित होत आहेत.



### दिवसाला ३० तक्रारी, महापालिकेचा दावा काय?

विस्कळीत, अपुरा अशा पाणीपुरवठ्याच्या तक्रारींमध्ये मोठी वाढ झाली आहे. एप्रिलमध्ये दिवसाला ३० तक्रारी पालिकेकडे येत आहेत. आंद्रा धरणातून मिळणाऱ्या पाण्यात मोठी घट झाल्याने पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. गृहनिर्माण संस्थेतील बोअरवेल आटल्याने नागरिकांची पूर्ण भिस्त पालिकेकडून मिळणाऱ्या पाण्यावर असल्याने मागणी वाढली आहे. ज्या भागात पाणीपुरवठा झाला नाही, तिथे टँकरने पाणीपुरवठा केला जात असल्याचे पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता श्रीकांत सवणे यांनी सांगितले. ज्या गृहनिर्माण संस्थांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) कार्यान्वित नाही, त्या संस्थांमधील सभासदांना मानकांप्रमाणे प्रतिदिन प्रतिमाणशी १३५ लिटरप्रमाणे पाणी दिले जाते. तर, सांडपाणी प्रक्रिया कार्यान्वित असलेल्या संस्थेतील सभासदांना ९० लिटर प्रतिमाणशी पाणी दिले जात असल्याचा पालिकेचा दावा आहे. प्रत्यक्षात अतिशय कमी, अपुऱ्या दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत.

परिणामी, शहराची लोकसंख्या २७ लाखांवर गेली आहे. पाण्याची गरज भागवण्यासाठी पालिका प्रतिदिन पवना धरणातून ५१० दशलक्ष लिटर (एमएलडी), आंद्रा धरणातून पहिल्या टप्प्यात ८०, तर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (एमआयडीसी) २० असे ६१० एमएलडी पाणी उचलते. मात्र, गेल्या पाच दिवसांपासून आंद्रा धरणातून अतिशय कमी पाणी मिळत आहे. गुरुवारी तर अवघे २१ एमएलडी पाणी मिळाले होते. त्यामुळे मोठी तूट झाली. परिणामी, समाविष्ट भागातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला. शहराच्या विविध भागांतून अपुऱ्या पाणीपुरवठ्याच्या तक्रारी आल्या. तूट भरून काढण्यासाठी पालिकेने पवना धरणातून दहा एमएलडी अधिकचे पाणी उचलण्यास सुरुवात केली आहे. उन्हाळ्याच्या सुटीत नागरिक गावाला जातील. त्यानंतर १५ एप्रिलनंतर सुसूत्रता येईल. लवकरच आंद्रा धरणातून पाणी कमी मिळण्याचा प्रश्न सुटेल असे प्रशासनाकडून सांगण्यात येते.

# महायुतीचा बालेकिल्ल्यात बारणेंच्या भेटीगाठी

## संत तुकाराम नगर भागास भेट : फटाके वाजून, औक्षण करीत उत्साहात स्वागत

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना- भाजप- राष्ट्रवादी व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी महायुतीचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संत तुकाराम नगर भागास भेट देऊन प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या भेटीगाठी घेतल्या. फटाके वाजून, औक्षण करीत त्यांचे मोठे उत्साहात स्वागत करण्यात आले.

भाजपचे ज्येष्ठ नेते व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी नगरसेविका सुजाता पालांडे, मुक्ता पडवळ, भाजपचे पदाधिकारी महेंद्र बाविस्कर, शिवसेना वाहतूक सेनेचे संजय यादव, संत तुकाराम नगर व्यापारी संघटनेचे अध्यक्ष किरण सुवर्णा, राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष यशवंत भोसले यांच्या निवासस्थानी तसेच सोहम लायब्ररी व एकता विकास मंडळ या ठिकाणी खासदार श्रीरंग बारणे यांनी सदिच्छा भेट दिली.

संत तुकाराम नगर भागात भाजप, शिवसेना तसेच राष्ट्रवादी काँग्रेसची मोठी ताकद आहे. तिन्ही पक्षांची महायुती असल्यामुळे या भागात खासदार श्रीरंग बारणे यांना एकतर्फी मतदान होईल, असा विश्वास सदाशिव खाडे यांनी व्यक्त केला. खासदार बारणे यांनी कामगारांच्या प्रश्नांकडे अधिक लक्ष द्यावे व कामगारांना न्याय मिळवून द्यावा, अशी अपेक्षा यशवंत भोसले यांनी व्यक्त केली. सर्व कामगार महायुतीच्या पाठीशी राहतील अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.



खासदार श्रीरंग बारणे यांच्या समवेत माजी नगरसेवक जितेंद्र ननावरे, शिक्षण मंडळाचे माजी उपसभापती मायला खात्री, माणिकराव अहिरराव तसेच राजेश वाबळे, मंगेश दाडगे, माऊली जगताप, लक्ष्मण रानवडे, उमेश पाटील, रवींद्र नामदे, जगन्नाथ नेरकर तसेच अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने होते.

त्यापूर्वी कासारवाडी येथे माजी नगरसेविका सुरेखा लांडगे तसेच ज्येष्ठ नेते दत्तात्रय लांडगे यांच्या निवासस्थानी खासदा र बारणे यांनी भेट दिली. भाजप नेते माऊली थोरात व प्रकाश जवळकर यांनीही खासदार श्रीरंग बारणे यांना शुभेच्छा दिल्या.

### अखिल राजस्थानी समाजाचा बारणे यांना पाठिंबा

**» खासदार बारणे यांनी संपूर्ण मतदारसंघातील राजस्थानी बांधवांना सातत्याने साथ दिली आहे. अडीअडचणी सोडवल्या आहेत. त्यामुळे मतदारसंघातील दीड लाख राजस्थानी बांधवांचा या निवडणुकीतही बारणे यांनाच पाठिंबा राहील, असे हरीश वर्मा यांनी जाहीर केले. पुणे-जोधपूर व पुणे- जयपूर या रेल्वे गाड्या सुरू केल्याबद्दल राजस्थानी बांधवांनी बारणे यांना धन्यवाद दिले. या गाड्या दररोज सोडण्यात याव्यात तसेच या गाड्यांना चिंचवड येथे थांबा सुरू करावा, अशी मागणी त्यांनी केली. खासदार बारणे हे या निवडणुकीत केवळ हॅट्रिकच पूर्ण करणार नाहीत तर त्यांना केंद्रात मंत्रिपदही मिळेल, असा विश्वास राजस्थानी बांधवांनी व्यक्त केला. खासदार बारणे यांनी अखिल राजस्थानी समाजाचे आभार मानले. मतदारसंघातील राजस्थानी बांधव पंतप्रधान नरेंद्र मोदी व आपल्याशी गेली अनेक वर्षे जोडला गेलेला आहे. राजस्थानी बांधवांनी त्यांच्या दुकानात येणाऱ्या प्रत्येक ग्राहकाला महायुतीलाच मतदान करण्यास सांगून प्रचारात सक्रिय सहभागी व्हावे, असे आवाहन बारणे यांनी केले.**

# शिवसेना, राष्ट्रवादीतील फुट कोल्हेंच्या पथ्यावर पडणार?

## भाजपच्या वर्धापन दिनानिमित्त पुण्यात भाजपकडून घर चलो अभियान

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर लोकसभा मतदारसंघात यंदा चांगलीच लढत होणार आहे. मागच्या निवडणुकीत राष्ट्रवादीकडून डॉ. अमोल कोल्हे यांनी सलग तीन टर्म वेळा निवडून आलेल्या शिवसेनेच्या शिवाजीराव आढळराव पाटील यांचा पराभव केला होता. आता पुन्हा एकदा आढळराव पाटील लोकसभेची निवडणुक लढत आहे, मात्र यावेळी ते राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अजित पवार गटाच्या घड्याळ चिन्हावर उतरले आहेत. तर डॉ. कोल्हे राष्ट्रवादीच्या कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या तुतारी चिन्हावर लढत आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी पक्षात फुट, राज्यात झालेले राजकीय बदल यामुळे ही निवडणुक चांगलीच चर्चेत राहण्याची शक्यता आहे.



राज्यात शिवसेनेसह राष्ट्रवादी पक्षात देखील मोठी फुट पडली असून याचा फटका उमेदवारांना बसण्याची शक्यता आहे. २०१९ साली अमोल कोल्हे यांनी जुन्नर, आंबेगाव, खेड-आळंदी, शिरूर येथे आघाडी घेतली होती. तर भोसरी आणि हडपसर येथे आढळराव पाटलांना मोठ्या प्रमाणात लीड मिळालं होतं. आता शिरूर लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघापैकी पाच आमदार महायुतीत सहभागी आहेत. अशातच जुन्नरमध्ये अतुल बेनके, आंबेगावमधून दिलीप वळसे पाटील तर खेड-आळंदीमधून दिलीप मोहिते पाटील हे अजित पवार गटात आहेत. त्यामुळे याठिकाणी आढळराव पाटलांना ताकद मिळण्याची शक्यता आहे.

दुसऱ्या बाजूला हडपसर आणि भोसरी विधानसभेत मागच्यावेळी आढळरावांना चांगलं मताधिक्य मिळालं होतं. यावेळीही भोसरीचे आमदार महेश लांगडे तर हडपसरचे आमदार चेतन तुपे हे महायुतीत आहेत. त्यामुळे याठिकाणांहूनही आढळराव पाटलांना लीड मिळणार असल्याची शक्यता आहे. दुसऱ्या बाजूला महाविकास आघाडीसोबत असलेले एकमेव आमदार अशोक पवार यांनी कोल्हेंना पाठिंबा जाहीर केलाय. त्यामुळे याठिकाणी आढळराव पाटलांची ताकद अधिक दिसून येत आहे.

दरम्यान, भोसरी विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या मोशी, चिखली, चऱ्होलीस भोसरी गावठाण या भागात २०१९ च्या निवडणुकीत आढळराव पाटलांना एक लाख २५ हजार ३३६ मते तर कोल्हे यांना ८८ हजार २५९ मते मिळाली होती. आढळरावांनी याठिकाणी ३७ हजार ७७ मतांची आघाडी घेतली होती. त्यामुळे याठिकाणांहून यंदा आढळरावांना पुन्हा आघाडी मिळणार का ? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

शिरूर लोकसभेतील सध्याची राजकीय परिस्थिती गावागावातील पारांवर चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. ही सगळी गावं उत्तर पुण्यात विस्तारलेली अन् नाशिक-अहमदनगरच्या सीमेवर वसलेली आहेत. पुणे-नाशिक आणि पुणे अहमदनगर अशा दोन महामार्गांच्या दुतर्फा हा मतदारसंघ विभागला आहे. शहरी-निमशहरी भाग या मतदारसंघात येत असल्यानं इथल्या समस्या ही तशाच आहेत. बागायत शेती, कांदा आणि टोमॅटोसाठी देशातील सर्वोत्तम बाजार पेठ असा विकसनशील मात्र आदिवासी पट्ट्यांमुळं तितकाच मागासलेपण ही या मतदारसंघाला लाभलेला आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळ, पुणे-नाशिक महामार्ग आणि लोहमार्ग, पुणे-अहमदनगर महामार्गावरील वाहतूक कोंडी, कांदा निर्यात, टोमॅटोचा दर, आदिवासी भागातील पाण्याची समस्या मतदारसंघातील असे विविध प्रश्न नेहमीचं प्रचाराच्या केंद्रस्थानी असतात.

### शिरूर लोकसभा मतदारसंघात पक्षीय बलाबल

» शिरूर लोकसभा मतदारसंघाची रचना आणि बावीस लाखांच्या घरात पोहचलेली मतदार संख्या पाहता उमेदवारांची प्रचारात चांगलीच दमछाक होते. अशावेळी मतदारसंघातील आमदारांचं महत्व वाढतं, ते आपल्या युतीतील अथवा आघाडीतील उमेदवाराचं नाव आणि चिन्ह मतदारांपर्यंत पोहचवण्याची भूमिका बजावतात. शिरूर लोकसभेत सध्या आंबेगावमध्ये मंत्री दिलीप वळसे पाटील, खेड-आळंदीत दिलीप मोहिते पाटील, हडपसरमध्ये चेतन तुपे हे आमदार अजित पवारांच्या राष्ट्रवादी गटाचे तर भोसरीमध्ये भाजपचे आमदार महेश लांडगे, शिरूर विधानसभेत अशोक पवार हे शरद पवारांच्या राष्ट्रवादी गटाचे आमदार आणि जुन्नरचे राष्ट्रवादीचे आमदार अतुल बेनके आहेत. बेनके स्वतःला तटस्थ म्हणवतात, मात्र त्यांचा जीव अजित दादांच्या सत्तेत अडकल्याचं प्रकर्षानं दिसून येतं. हे पाहता अजित पवार गटाची अर्थात महायुतीची ताकद कागदावर तरी नक्कीच जाणवते. मात्र एकनाथ शिंदे आणि अजित पवारांचा महायुतीच्या सत्तेत पोहचण्याचा घटनाक्रम जनतेला भावलाय का? अजित दादांनी खासदार अमोल कोल्हेंना आव्हान दिलंय खरं, पण कोल्हेंची घोडेस्वारी रोखणारा तुल्यबळ उमदेवार दादांकडे आहे का? यदाकदाचित दादांनी नवा पत्ता उघडलाच तर तो जनता स्वीकारेल का? या सगळ्या प्रश्नांची उत्तरं फक्त आणि फक्त मतदारचं देणार आहेत. त्यासाठी लोकसभेच्या निकालाची प्रतीक्षा करावी लागेल.

# महापालिकेचा इशारा; रस्ते खोदाई केल्यास फौजदारी कारवाई

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा विनापरवाना खोदाई केल्यास फौजदारी कारवाईचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

विविध कामांसाठी रस्ते खोदाई करण्याकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने १५ मे २०२४ पर्यंत परवानगी दिली आहे. त्यानंतर विनापरवाना खोदाई केल्यास फौजदारी कारवाईचा इशारा पालिकेने दिला आहे.

पाणी पुरवठा विभाग, फायबर नेटवर्किंग, महावितरण, एमएनजीएची पाइपलाइन टाकण्यासह विविध कामांसाठी रस्ते खोदाई करण्याकरिता १५ मे २०२४ पर्यंत परवानगी दिली जाणार आहे. त्यानंतर विनापरवाना खोदाई केल्यास फौजदारी कारवाईचा इशारा पालिकेने दिला आहे.

विविध सेवा वाहिन्यांच्या कामासाठी वारंवार केले जाणारे खोदकाम आणि त्यानंतर केल्या जाणाऱ्या दुय्यम दर्जाच्या रस्ते दुरुस्तीमुळे शहरातून वाहने चालविणे अवघड होते. त्यामुळे लहान-मोठे अपघात होतात. ते टाळण्यासाठी शहरातील मुख्य रस्ते आणि अतिवर्दळीच्या रस्त्यांवरील जलवाहिन्या, जलनिस:रण वाहिका, पावसाळी गटरे, इंटरनेट आणि अन्य केबल, एमएनजीएल तसेच, वीज वाहिन्यांची कामे येत्या १५ मे पर्यंत पूर्ण करावीत, असे महापालिकेने स्पष्ट केले आहे. त्यानंतर खोदकामास परवाना



दिला जाणार नाही.

केवळ अत्यावश्यक बाब म्हणून काही कामांसाठी रस्ते खोदाईला परवानगी दिली जाणार आहे. रस्त्यांची दुरुस्ती आणि डांबरीकरणाची कामे पावसाळ्यापूर्वी करण्यात येणार आहेत. त्याबाबतच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. पावसाळ्यात कोणत्याही कामासाठी रस्ते आणि पदपथ खोदकामास परवानगी दिली जाणार नाही.

केवळ अत्यावश्यक आणि अतितातडीच्या कामांना अटी आणि नियम टाकून परवानगी दिली जाणार आहे. विनापरवाना खोदकाम केल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई तसेच, फौजदारी गुन्हा दाखल केला जाणार असल्याचे महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम यांनी सांगितले.